**म. ए. सो. च्या आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचा सलग 12 व्या वर्षी प्रजासत्ताक दिन शिबिरात सहभाग**

महाराष्ट्र एज्यूकेशन सोसायटी च्या आबासाहेब गरवारे महाविद्यालयातील विद्यार्थी सलग 12 व्या वर्षी नवी दिल्ली कर्तव्य पथावर होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात सहभागी होणार आहे. ह्या वर्षी महाविद्यालयातील 3 कॅडेट्स ची निवड या संचलनासाठी झाली आहे. ही महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. एक महिना चालणाऱ्या या शिबिरात 28 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील एकूण 2274 कॅडेट सहभागी होणार आहेत. या वर्षी महाराष्ट्रामधील 119 कॅडेट्स संचालनालयाचे प्रतिनिधीत्व करणार आहेत. यात आबासाहेब गरवारे महाविद्यालयाच्या 3 कॅडेट्सची निवड करण्यात आली असून यामध्ये 2 कॅडेट नेव्हल विंगचे आणि 1 आर्मी विंगचा आहे. सहभागी होणारे कॅडेट पुढीलप्रमाणे आहेत: - प्रजासत्ताक दिन शिबिर सर्वोत्कृष्ट कॅडेटसाठी जूनियर अंडर ऑफिसर तेजस कांबळे , आरडीसी सांस्कृतिकसाठी लीडिंग कॅडेट सलोनी महस्के आणि गार्ड ऑफ हॉनर आरडीसीसाठी लीडिंग कॅडेट श्रीकृष्ण होगळे यांची निवड झाली आहे. हा एनसीसीमधील प्रतिष्ठित शिबिरांपैकी एक आहे. हा आपल्यासाठी एक अभिमानाचा क्षण आहे.

2024 च्या प्रजासत्ताक दिन शिबिराचे उद्घाटन जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात ए.डी.जी. लेफ्टिनेंट जनरल गुरबीर पाल सिंघ.यांच्या हस्ते होणार आहे आणि 28 जानेवारी रोजी पंतप्रधानांच्या रॅलीने त्याची सांगता होणार आहे. महिनाभर चालणाऱ्या या शिबिरात कॅडेट्स विविध उपक्रमांमध्ये सहभागी होतील, ज्यात राजपथ मार्च, पंतप्रधानांसाठी गार्ड ऑफ ऑनर, पंतप्रधानांची रॅली, लाईन लेआउट, फ्लॅग एरिया ब्रीफिंग आणि सांस्कृतिक कार्यक् ह्या शिबिरांत सहभागी होतील. कॅडेट्सचा समावेश असलेल्या या तुकडीला ब्रिगेडियर अर्जुन मीत्रा यांच्या हस्ते पुण्यातील एनसीसी ग्रुप मुख्यालयातून हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले.

या कडेट्सना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास उगले , 3 महा. नेवल यूनिट चे कमान अधिकारी आपलेश मोहन, 2 महा. बटालियन एनसीसी पुणे चे कमान अधिकारी कर्नल मनदीप सिंग तसेच महाविद्यालयाचे एनसीसी अधिकारी कॅप्टन संदिप नवले, डॉक्टर राजेंद्र जमदाडे यांचे मार्गदर्शन लाभले. या कॅडेट्सचे त्यांच्या यशाबद्दल मनापासून अभिनंदन.




**जेयुओ तेजस कांबळे**



**लीडिंग कॅडेट सलोनी म्हस्के**



**लीडिंग कॅडेट श्रीकृष्ण होगले**